# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः09.08.2025** **वारःशनिवार**

---

1. सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात एलपीजी सिलिंडर उपलब्ध होण्यासाठी 30 हजार कोटी रुपयांच्या निधीला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी,
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची रशियाच्या अध्यक्षांशी दूरध्वनीवरून बातचीत, या वर्षाच्या अखेरीला होणाऱ्या 23व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी पुतीन यांना दिलं निमंत्रण
3. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप येत्या 15 ऑगस्टला रोजी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांची अलास्का इथं भेट घेणार
4. भारतीय रेल्वेद्वारे रुद्रास्ट्र या साडेचार किलोमीटर लांबीच्या आशियातील सर्वात मोठ्या मालवाहू गाडीची यशस्वी चाचणी

**<u>कॅबिनेट निर्णय</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली काल नवी दिल्लीत झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात एलपीजी सिलिंडर उपलब्ध व्हावा यासाठी 30 हजार कोटी रुपयांच्या निधीला बैठकीत मंजुरी देण्यात आली. पेट्रोलियम कंपन्यांना नुकसानीची भरपाई म्हणून ही रक्कम दिली जाणार आहे. याशिवाय प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांसाठी 12 हजार कोटी रुपयांहून अधिक निधीलाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. सध्या या योजनेचे 10 कोटी 33 लाख लाभार्थी आहेत आणि त्यांना कमाल 9 सिलिंडरसाठी प्रति सिलिंडर 300 रुपयांचं अनुदान दिलं जातं. तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्थांसाठी 4 हजार 200 कोटी रुपये द्यायलाही या बैठकीत मान्यता मिळाली. देशभरातल्या पावणे 300 संस्थांना यातून मदत दिली जाईल. आसाम आणि त्रिपुरासाठी सव्वा 4 हजार कोटी रुपयांच्या विशेष पॅकेजलाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली.

**<u>मोदी-पुतीन</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. यावेळी पुतिन यांनी पंतप्रधान मोदी यांना युक्रेनशी संबंधित ताज्या घडामोडींची माहिती दिली. रशिया आणि यूक्रेन या देशांमधल्या संघर्षावर शांततापूर्ण मार्गाने तोडगा निघावा, या भारताच्या ठाम भूमिकेचा पुनरुच्चार मोदी यांनी यावेळी केला. दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय मुद्द्यांच्या प्रगतीचा आढावा घेतला तसंच भारत-रशिया धोरणात्मक भागीदारी आणखी दृढ करण्याच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. या चर्चेवेळी, मोदी यांनी या वर्षाच्या अखेरीला होणाऱ्या 23 व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी भारतात येण्याचं पुतीन यांना निमंत्रणही दिलं.

**<u>ट्रंप-पुतीन</u>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप येत्या 15 ऑगस्ट रोजी रशियाचे राष्ट्रपती व्लादिमीर पुतीन यांची अलास्का इथं भेट घेणार आहेत. अशी माहिती ट्रुथ या समाजमाध्यमावर काल त्यांनी दिली. यावेळी युक्रेनशी सुरू असलेलं युध्द थांबवण्यासंदर्भात चर्चा होण्याची शक्यता आहे. अर्मेनिया आणि अझरबैजानयांच्या दरम्यान संघर्ष संपवून शांततेसाठी प्रयत्न करण्यासाठी योजना आखण्यात आली असल्याची घोषणा केल्यानंतर पुतीन यांना भेटणार असल्याचं ट्रंप यांनी जाहीर केलं. गेल्या 10 वर्षांतील पुतीन

यांची ही पहिलीच भेट असेल. युक्रेनमधील युध्द संपवण्यासंदर्भात पुतीन यांच्याशी चर्चा करणार असल्याचं ट्रंप यांनी नुकतंच वार्ताहरांना सांगितलं होतं त्यांनंतर ही घोषणा करण्यात आली.

**<u>अझरबैजान-अर्मेनिया</u>**

दरम्यान, अझरबैजानचे अध्यक्ष इल्हम अलीयेव आणि अर्मेनियाचे पंतप्रधान निकोल पाशिनयान यांनी परस्परातील गेल्या 10 वर्षांपासून सुरु असलेला संघर्ष संपवण्यासंदर्भातील करारावर स्वाक्षरी केली आहे. काल अमेरिकेतील व्हाईट हाऊसमध्ये ट्रंप यांनी आयोजित केलेल्या स्वागत समारंभानंतर ही स्वाक्षरी करण्यात आली. दोनही देशांदरम्यानची महत्वाची दळणवळण मार्ग सुरु होतील आणि व्यापार तसंच परराष्ट्रसंबंधविषयक वाटाघाटींना चालना मिळेल. या कराराचा एक भाग म्हणून, अमेरिका दळणवळणासाठी महत्त्वाचा कॉरिडॉर बांधण्यास मदत करेल त्याला आंतरराष्ट्रीय शांती आणि समृद्धीसाठी ट्रम्प मार्ग असे नाव दिले जाईल. अशी माहिती व्हाईट हाऊसनं दिली आहे.

**<u>रुद्रास्ट्र रेल्वे</u>**

भारतीय रेल्वे खात्यानं रुद्रास्ट्र या साडेचार किलोमीटर लांबीच्या आशियातील सर्वाधिक लांबीच्या मालवाहू गाडीची यशस्वी चाचणी घेऊन खूप मोठा टप्पा गाठला आहे. उत्तर प्रदेशातल्या चंदौलीतील गंजख्वाजा स्थानकापासून झारखंडमधल्या गरवा स्थानकादरम्यानच्या 209 किलोमीटरच्या टप्प्यात या गाडीची चाचणी घेतली. या गाडीनं ताशी साडेचाळीस किलोमीटर या वेगानं 5 तास 10 मिनिटात हे अंतर पार केलं. आशियातील सर्वात लांब या मालवाहू ट्रेनमुळे मालवाहतूक करणं आणि त्यामध्ये माल भरण्याचं काम जलद होईल, त्यामुळे साधनसंपत्तीची आणि वेळेचीही बचत होईल असं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. त्यांनी या गाडीच्या चाचणीवेळचा व्हिडिओही समाज माध्यमावर शेअर केला आहे.

**<u>राखी पौर्णिमा</u>**

संपूर्ण देशभर आज राखी पौर्णिमा अर्थात रक्षाबंधन हा बहिण-भावांमधील खास नात्याचा सण साजरा करण्यात येत आहे. या दिवशी बहिणी भावांना राखी बांधून त्यांच्या भरभराटीची, उत्तम आरोग्याची आणि सुखी आयुष्याची सदिच्छा व्यक्त करतात, तर भाऊ बहिणींना भेटवस्तू देऊन त्यांच्या सदैव पाठीशी राहून त्यांचं रक्षण करण्याचं वचन देतात. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी समस्त देशवासीयांना रक्षाबंधनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. समाजात सलोखा आणि एकतेची भावना वाढण्यास चालना देणारा हा सण असल्याचं राष्ट्रपतींनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**<u>GEM-स्थापना दिवस</u>**

केंद्र सरकारच्या ई मार्केटप्लेस अर्थात GeM च्या सकल व्यवसाय मुल्यानं 2024-25 या आर्थिक वर्षात साडेपाच लाख कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. अशी माहिती जीईएमचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिहीर कुमार यांनी काल दिली. विपणनाची ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देणाऱ्या या पोर्टलचा 9व्या स्थापना दिनानिमित्त नवी दिल्ली इथं आयोजित कार्यक्रमांत ते बोलत होते. शासनाच्या प्रक्रियांना सर्वसमावेशक बनवणं आणि परिणामकारकरित्या अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचवणं हा यामागील उद्देश असल्याचं ते म्हणाले.

**<u>टोमॅटो भाव</u>**

देशभर टोमॅटोच्या किरकोळ दरात मोठी वाढ झाली आहे, याला मूलभूत मागणी आणि पुरवठा यांच्यातील असमतोल किंवा उत्पादनातील घट नव्हे तर तात्पुरते स्थानिक घटक कारणीभूत असल्याचं सरकारनं म्हटलं आहे. देशाच्या उत्तर आणि वायव्य भागात जुलैच्या शेवटच्या आठवड्यापासून झालेल्या मुसळधार पावसामुळे टोमॅटोचे भाव कडाडले असून दिल्ली मध्ये सध्या ते प्रति किलो 73 रुपयांवर पोहोचले आहेत, असं ग्राहक आणि अन्न पुरवठा मंत्रालयानं म्हटलं आहे. हवामानाशी संबंधित कारणांमुळे जुलैच्या अखेरीस ते 85 रुपये किलोपर्यंत देखील पोहोचले होते. त्यानंतर दिल्लीच्या आझादपूर मंडीमध्ये पुरवठा सुरळित सुरू झाल्यापासून टोमॅटोचे दर स्थिरावत आहेत. मुंबई, चेन्नई यांसारख्या शहरांमध्ये मात्र अशी मोठी भाववाढ आढळलेली नाही. सध्या

संपूर्ण देशभर टोमॅटोचा सरासरी दर 52 रुपये प्रति किलो इतका आहे. दरम्यान गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा कांदा आणि बटाट्याच्या उत्पादनात वाढ झाली असल्यानं त्यांचा पुरेसा पुरवठा होत आहे आणि त्यांचे भावही स्थिर असल्याचंही मंत्रालयानं नमूद केलं आहे.

**मनकी बात**

आकाशवाणीवरुन प्रसारित होणारा मन की बात हा मासिक कार्यक्रम सुरू झाल्यापासून त्याद्वारे आतापर्यंत 34 कोटी रुपयांहून अधिक उत्पन्न मिळालं असल्याचं माहिती आणि प्रसारण राज्य मंत्री डॉ. एल मुरगन यांनी काल राज्यसभेत लेखी उत्तरात दिली. देशभरात शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, नवोन्मेष आणि सामाजिक सेवेसारख्या क्षेत्रांमध्ये प्रभावी काम करणाऱ्या प्रेरणादायी संस्था आणि व्यक्तींबद्दलची माहिती तसंच राष्ट्र उभारणीच्या कामांत हातभार लावणाऱ्यांची माहिती पंतप्रधान देतात. त्यामुळे या रेडिओ कार्यक्रमाला मोठा श्रोता वर्ग लाभला आहे. आकाशवाणी, दूरदर्शन तसेच इतर सर्व डिजीटल वाहिन्यावरुन या कार्यक्रमाचे थेट प्रसारण केलं जातं. तसंच प्रादेशिक भाषेतील प्रसारणामुळे तो सर्वदूर पोहोचण्यास मदत होते. असंही ते म्हणाले.

**उत्तराखंड**

उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यातील भुस्ख्खलन झालेल्या धराली हरसील भागातील मदत आणि बचावकार्य युध्दपातळीवर सुरु आहे. केंद्रिय तसंच राज्य आपत्ती निवारण दलाचे जवान, सैन्यदल, पोलीस आणि स्थानिक नागरिक बेपत्ता लोकांचा शोध घेत आहेत तसंच बचावलेल्या नागरिकांना सेवा सुविधा पुरवण्याचं काम करत आहेत. या भागातून आतापर्यंत 629 जणांना सुरक्षित बाहेर काढण्यात सुरक्षा दलाला यश आलं आहे.

**हवामान**

आंध्र प्रदेश, बिहार, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मिर, मध्य प्रदेश, ओडीशा, पुदुचेरी, कराईकल, तेलगणा, उत्तर प्रदेश तसंच ईशान्येकडील भागात पुढील 2 ते 3 दिवस मुसळधार पावसाचा अंदाज आहे. अरुणाचल प्रदेशमध्ये आज अतिमुसळधार पाऊस पडेल असा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.